|| श्री गणेशाय नमः ||

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

Astro • Puja • Vastu

## आरती शंकराची

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ।। विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ।।
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा ।। तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळां ।।१।।

जय देव जय देव श्रीशंकरा ।। आरती ओवाळू तुज कर्पूरगौरा ।। धृ० ।।

कर्पूरगौरा भोळा नयनीं विशाळा ।। अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ।।
विभूतीचें उधळण शितिकंठ नीळा ।। ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।। जय०२।।

देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें ।। त्यामाजीं अवचित हलाहल सापडले।
तें त्वां असुरपणें प्राशन केलें ।। नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें।। जय०३।।

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी।। पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी।।
शतकोटीचे वीज वाचे उच्चारी ।। रघुकुळटिळक रामदासा अंतरी ।। जय०४।।

### कर्पूरगौरा गौरिशंकरा

कर्पूरगौरा गौरिशंकरा आरति करूं तुजला । नाम स्मरतां प्रसन्न होउनि पावसि भक्ताला ॥ धृ ॥

त्रिशूळ डमरू शोभत हस्तीं कंठिं रुंडमाळा । उग्रविषातें पिऊनी रक्षिसी देवां दिक्पाळां ॥
तृतीय नेत्रीं निघती क्रोधें प्रळयाग्नीज्वाळा । नमिती सुरमुनि तुजला ऐसा तूं शंकर भोळा ॥ १ ॥

ढवळा नंदी वाहनशोभे अर्धांगीं गौरी । जटा मुकुटीं वासकरितसे गंगासुंदरी ॥
सदया सगुणा गौरीरमणा मम संकट वारीं । मोरेश्वरसुत वासुदेव तुज स्मरतो अंतरीं ॥ २ ॥


**HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA**

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 95944 28749 | निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी) : 86524 02078

**SANPADA OFFICE**
Office No.8, 1st Flr, Shiva Triveni Galleria CHS.,
Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar
Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com